धारेश्वर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित;

# कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लि.)
# ता. कन्नड जि. औरंगाबाद.

## राष्ट्रीय सेवा योजनेचा नियमित कार्यक्रम अहवाल सन २०२१-२०२२.

राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे विद्यार्थ्यांची जडणघडण घडवून त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या विकासासोबत स्वंयसेवकांना एक जबाबदार, सक्षम, श्रजनशील, श्रमसंस्कारी नागरिक निर्माण करण्याची चळवळ आहे. राष्ट्रीय सेवा योजना सामाजिक बांधीलकीची योजना असून यामध्ये राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रभक्ती, पर्यावरण, अंधश्रध्दा निर्मूलन, दहशतवादाचे उच्चाटन, जगावर आलेल्या नैसर्गीक व मानव निर्मीतसंकटाच्या काळातसहकार्य, त्याविषयी जागरुकता निर्माण करणे, त्याशिवाय शासन आणि प्रशासनाला अश्या कार्यक्रमात सहकार्य करणे.आदी अनेक राष्ट्रीय प्रश्नांना सोबत घेवून चालणारी राष्ट्रीय युवक आंदोलनाची चळवळ आहे. युवक-युवतींच्या सृजनशिलतेला चालना देऊन त्यांच्या विधायक कार्यातून समाज परिर्वनाकरीता कार्यान्वित करण्याच्या उद्देशाने या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेत विविध उपक्रम राबविले जातात. जसे सामाजिक ऐक्य पंधरवाडा, स्वास्थ्यासाठी योगा दिन, पर्यावरणाच्या संवर्धनासाठी वृक्षारोपन, स्वंयसेवकांच्या बौध्दीक विकास करण्यासाठी अनेक विविध स्पर्धा रा.से.योच्या माध्यमातून घेतल्या जातात उदा. निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, प्रश्नमंजूषा, ग्रामस्वच्छता अभियान, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, पर्यावरण संरक्षण राष्ट्रप्रेम आदी शिक्षणाबरोबरच समाज सेवा आणि अशा विविध गुणांचे संस्कार रा.से. यो. च्या माध्यमातून राबविले जातात.

कला व विज्ञान महाविद्यालय चिंलोली (लि.) ता. कन्नड येथे नियमित कार्यक्रमासाठी २०० विद्यार्थाची मान्यता आहे. तर विशेष शिबीरासाठी १०० विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने मान्यता दिलेली आहे. **आमचे महाविद्यालय हे ग्रामीण भागात असून पहिल्या लॉकडाऊनच्या काळातग्रामीण भागात विशेषता औरंगाबाद जिल्हयातील चिंचोली लिंबाजी परिसरात कोरोनाचा प्रसार अत्यअल्प होता. त्यामूळे आम्ही रा.से.यो च्या माध्यमातून यावर्षी COVID-19 कोरोना माहामारीच्या काळात** विद्यार्थाचे प्रवेश घेणे चालू असतांना **आम्ही सुरक्षेची काळजी घेवून व शासनाच्या नियमाचे पालन करुन** विद्यार्थ्यांमध्ये

नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी महाविद्यालयात नियमित कार्यक्रमांचा भाग म्हणून **काही ऑनलाईन पध्दतीने व काही ऑफलाईन पध्दतीने** विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यामध्ये प्रामूख्याने कोरोना विषयी जनतेने काळजी कशी घ्यावी, शासन नियमावली त्रिसूत्रीकार्यक्रमा विषयी प्रसार, मास्क वापर, हात धूने, अंतर राखने, आवश्यक कार्या शिवाय बाहेर न पडने, याविषयी आम्ही ग्रामीण भागात जागरुकता वाढवण्यावर भर दिला आहे. त्याच बरोबरच कोरोना लाटेच्या दुस-या टप्यात आम्ही कोरोना लस घेण्याविषयी जनतेमध्ये जागृतीकरण्याकडे जास्तीत जास्त लक्ष देवून लस घेण्याविषयी ग्रामिण भागातील, परिसरातील नागरिकांची लस घेण्याची संख्या वाढवण्यावर भद दिला आहे. घरोघरी भेटी देसून महत्व पटवून देण्यात आले. त्याशिवाय **ऑनलाईन पध्दतीने स्वंयसेवकानां परीसरात कोरोना काळातील जागृती या व या सारख्या** अनेक उपक्रमांमधून युवकांचे नेतृत्व विकसित केले गेले. यामूळे विद्यार्थामध्ये न्युंनगंडाची जागा त्यांच्यामधील आत्मविश्वासने घेतली. यासारख्ये प्रयत्न आमच्या सर्वांसाठी आशादायक होते. कारण आम्ही विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि सामाजिक सेवा, महामारीच्या काळातील शासन व प्रशासनाला सहकार्य करणे आदी केंद्र स्थानी ठेवून कार्य केलेले आहेकरत आहोत.

सबब आमच्या महाविद्यलयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागा अतंर्गत नियमित कार्यक्रमाचा थोडक्यात अहवाल पुढील प्रमाणे आहे. मा. संचालकानी त्याचे अवलोकन करावे. हि. विनंती.

१. **२१ जुन २०२१ आंतरराष्ट्रीय योगा दिन :-**यावर्षी कोरोना महामारीमूळे आणि सदर काळात महाविद्यालय बंद असल्याने **Online Yoga या नुसार** आंतरराष्ट्रीय योग दिना निर्मीताने राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वंयसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी व महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांना योगाचे प्रशिक्षण ऑनलाईन च्या माध्यमातून प्रत्येक्षिक दाखवून महत्व सांगण्यात आले. पहिल्या सत्रात प्रा. सुनिल काळे आणि श्रीमती गवते मॅडम यांनी योगासनाची प्रात्याक्षिके दाखवली व दुपारच्या सत्रात योगाचे महत्व यावर मार्गदर्शन करण्यात आले आहे.

**२. वृक्षारोपण :-**माहे जूलै मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपन करण्यात आले. हे वृक्षारोपन आम्हीसुरक्षेची काळजी घेवून व शासनाच्या नियमाचे पालन करुन महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील स्टाफ व रा.से.यो चे स्वंयसेवक उपस्थितीत होते.

**३. लोकशाहीर आण्णा भाऊ साठे व लोकमान्य ठिळक जयंती व पुण्यतिथी :-** आमच्या महाविद्यालयात दिनांक ०१/०८/२०२१ रोजी रा.से.यो. विभागाअंतर्गत लोकशाहीर आण्णा भाऊ साठे जंयती व लोकमान्य ठिळक पुण्यतिथीसाजरीकरण्यात आली. यावेळी डॉ. संजय मगर अर्थशास्त्र विभाग प्रमूख आणि ग्रंथपाल डॉ. योगेश भाले यांनी मार्गदर्शनकेले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. वंदना पाटील यांनीकेलेतर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रतिभा आघार्डे यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील स्टाफ आणि स्वंयसेवक मोठयासंख्येने उपस्थितीतहोते.

**४. स्वच्छता पंधरवाडा :-**दिनांक १२/०८/२०२१ रोजी रा.से.योजने चे विद्यार्थी एकत्र येवून महाविद्यालयातील परिसराची स्वच्छता केली. तसेच आपला देश आणि आपला परिसर स्वच्छ करण्याच्या अभियात म्हणजेच स्वच्छ भारत अभियानात जनतेचा सहभाग वाढवण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

**५. स्वांतत्र्य दिन ध्वजारोहन :-** १५ ऑगस्ट २०२१ स्वातंत्र्य दिनकार्यक्रम घेण्यात आला. यावेळी टी.पी. पाटील साहेब यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य विक्रमसिंह पवार होते. याप्रंसगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**६. मतदान जागृती कार्यक्रम :**मतदार राजा जागृतहो। हा कार्यक्रम आम्ही सामाजिक अंतरपाळून व शासन नियमावलीचे पालन करुन ऑफलाईन पध्दतीने केला व या प्रसंगी मतदान नि:पक्षपणे आणि कुठल्याली अमिषाला बळी न पडता मतदानकरण्याची शपथ घेतली व याविषयी स्वंयसेवकांनी नागरिकामध्ये जागृती वाढवावी असे ठरले. सदर कार्यक्रमाच्या वेळी मोठया संख्येने रासेयो स्वंयसेवक व महाविद्यालयातील स्टाफ उपस्थित होता.

**७. विद्यापीठ वर्धापन दिन :-** दिनांक २३/०८/२०२१ रोजी विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त रा.से.यो चे विद्यार्थीनी एकत्र येवून महाविद्यालयातील परिसर स्वच्छता केली. प्राचार्य विक्रमसिंह पवार यांच्या हस्ते विद्यापीठाच्या ध्वजाचे ध्वजारोहन करण्यात आहे. या प्रसंगी महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थितीतहोते.

**८. शिक्षक दिन :-** दिनांक ०५ सप्टेबंर २०२१ रोजी महाविद्यालयात रा.से.यो. विभागा अंतर्गत शिक्षक दिनसाजराकरण्यात आला.या प्रसंगी मार्गदर्शक म्हणूनइतिहास विभागाचे डॉ.संजय वाकळे यांनी स्वंयसेवकांना मार्गदर्शनकेले. ज्या देशाची शिक्षण व्यवस्था योग्य पध्दतीनेकार्यकरते त्या देशाचा युवा सक्षम असतो शिवाय त्या देशाच्या प्रगतीलागती मिळते असे प्रतिपादन प्रा. राऊत यांनीकेले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार होते. कार्यक्रमाचेसुत्रसंचालन डॉ. अनिता खंडागळे यांनी मानलेतर अभार रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**९. राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन:-** दिनांक २४ सप्टेंबर २०२१ रोजी रा.से.योजना विभाग व्दारे राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिनानिमीत्तानेकार्यक्रमाचेऑनलाईनआयोजनकरण्यात आले. यावेळी कोरोना महामारी मूळे इतरकार्यक्रमाचे आयोजन न करता महाविद्यालयातच स्वंयसेवकांना **मास्क व सानीटायझर** वाटप करण्यात आले आणि त्यांना ज्या नागरीकांना मास्क व सानीटायझर घेणे शक्य नाही अशा व्यक्तीना तुम्ही मदतकरा अथवा गरजू नागरीकानासहकार्यकरा अशी शिकवण देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रस्तावीक कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांनीकेलेतरसुत्रसंचालन प्रा. प्रतिभा आघार्डे यांनीकेलेतर आभार डॉ.वंदना बनकर यांनी मानले. सदरकार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तरकर्मचारी यांनीसहकार्यकेले.

**१०. महात्मा गांधी जयंती :-** राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे दिनांक ०२ ऑक्टोबर २०२१ रोजी महात्मागांधीयांचीजयतीसाजरीकरण्यात आली. याप्रसंगी मार्गदर्शक म्हणून डॉ. संजय मगरहेहोते.डॉ. मगर यांनी महात्मागांधीचे जीवन चरित्र आणि कार्य यावर प्रकाश टाकला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विक्रमसिंह पवार होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांनीकेलेतरकार्यक्रमाचेसुत्रसंचालन डॉ. वंदना बनकर यांनीकेलेतर अभार प्रा. प्रतिभा आघार्डे यांनी मांनले.याशिवायरा.से.यो विभागाच्या अनेक उपक्रम राबवण्यात आले. त्यामध्येमहाविद्यालयाचा परिसर स्वच्छता करण्यात आली. सदर उपक्रमासाठी रा.से.यो.चे स्वंयसेवक उपस्थित होते.

**११. संविधान गौरव दिन व संविधान सप्ताह निमित्त कार्यक्रम :-** दिनांक २६/११/२०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महाविद्यालयात संविधान गैरव दिन ऑनलाईन पध्दतीने साजराकरण्यात आला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यलयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार होते. या प्रसंगी परभणी येथील ॲड अमोल गिराम आणि डॉ विनोद खैरेहे प्रमूख मार्गदर्शक म्हणून उपस्थीतहोते. प्रतिमेचे पुजन करुन भारतीय संविधावर भाष्य करण्यात आले. तसेच संविधानाच उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन केले गेले. कार्यक्रमाचे प्रस्तावीक व सुत्रसंचालन प्रा. राजेश काबळे यांनीकेलेतर आभार रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ.गजानन -चिट्टेवाड यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व स्टाफ आणि रा.से.यो.स्वंयसेवक उपस्थित होते. त्या शिवाय संविधान सप्ताह निमित्ताने रा.से.यो. विभाग व लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने दिनांक ११-१०-२०२१ रोजी व्याख्यानाचे आयोजन करुन सदरकार्यक्रमासाठी मार्गदशक म्हणून परभणी येथील ॲड अमोल गिराम यांना आमत्रीतकरण्यात आले.

**१२. संत गाडगेबाबा पुण्यतिथी :-** राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी करण्यात आली याप्रसंगी मार्गदर्शक डॉ. यंशवत गाडे यांनी गाडगेबाबा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. पुरुषोत्तम मनगटे यांनी केल ेतर अभार डॉ. उमांकात गायकवाड यांनी मानले.

**१३. सावित्रीबाई फुले जयंती :-**

दिनांक ०३ जानेवारी २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे क्रांती ज्यांती सावित्रीबाई फुले यांची जंयती साजरी करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विक्रमसिंह पवार होते. तर मार्गदर्शक म्हणून प्रा. प्रतिभा आघार्डे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या समग्र कार्यावर सखोल असे मार्गदर्शन केले. संचालन डॉ. अनिता खंडागळे यांनी केले तर अभार प्रा. वंदना पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी तसेच रा.से. यो. स्वंयसेवक उपस्थितीत होते.

**१४. स्वामी विवेकानंद व जिजाऊ जयंती :-**

**हिंदवी स्वराज्याचे प्रेरणास्थान राजमाता जिजाऊसाहेब आणि भारतातील अध्यात्मिक क्रांतीचे प्रणेते स्वामी विवेकानंद यांची जयंती धारेश्वर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली लिं. येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभागद्वारे दिनांक** 12 **जानेवारी** 2022 **रोजी साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विक्रमसिंह पवार सर होते तर या प्रसंगी राजमाता जिजाऊ यांच्या जीवन कार्यावर इतिहास विभाग प्रमुख डॉ.संजय वाकळे यांनी विचार मांडले तर जगाला अध्यात्म, तत्त्वज्ञान आणि वैराग्याची शिकवण देणारे युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्यावर लोकप्रशासन विभाग प्रमुख, डॉ.गजानन चिट्टेवाड यांनी विचार व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे संचालन डॉ. पुरुषोत्तम मनगटे यांनी केले तर आभार डॉ.वंदना बनकर यांनी मानले.**

**१५. विद्यापीठ नामाविस्तार दिनः- १४ जानेवारी रोजी** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नाम विस्तार दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पावर यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. संजय वाकळे इतिहास विभाग प्रमूख यांनी नामविस्तार दिनाचा इतिहास सांगितला डॉ. उमाकांत गायकवाड यांनी प्रस्ताविक व सुत्र संचालन केले व डॉ. वंदना बनकर यांनी अभार मानले.

**१६. गाडगे महाराज जयंती :- आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत... देव माणूस आणि संत माणूस होऊन जगण्यापेक्षा माणूस म्हणूनच मानवतेची आयुष्यभर सेवा करण्यात धन्यता मानणारे महाराष्ट्राचे परखड प्रबोधनकार, समाज सुधारक, कीर्तनकार, राष्ट्रसंत, कर्मयोगी गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्ताने, धारेश्वर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत दिनांक** 23-02- 2022 **रोजी मौजे भिलवडी येथील जिल्हा परिषद शाळेवर आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शाळेतील मुलांना फळाचे वाटप सुद्धा करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष समाजशास्त्र विभाग प्रमुख पुरुषोत्तम मनगटे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. गणेश साबळे आणि डॉ नवले सर उपस्थित होते सदर कार्यक्रमाचे संचालन जिल्हा परिषद चे मुख्याध्यापक श्री शिवनाथ वाडेकर सर यांनी केले तर प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.गजानन चिट्टेवाड यांनी केले तसेच कार्यक्रमाचे सांगता व आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रतिभा आघाडे मॅडम यांनी केले. याप्रसंगी शाळेतील मुलं व येथील शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.**

**१७. छत्रपती शिवाजी महाराज जयंती :-** दिनांक १९ फेब्रूवारी २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज जंयती उत्साहात साजरी करण्यात आली. यांप्रसगी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार यांनी महाराजाच्या प्रतिमेचे पूजन केले. व प्रा. सुनिल काळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. तर अभार डॉ. अनिता खंडागळे मॅडम यांनी मानले. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील स्टाफसह रा.से.यो स्वंयसेवक मोठया प्रमाणात उपस्थितीत होते. कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीत यांनी करुन स्वंयसेवक यांना अल्पोहार व चहा देऊन करण्यात आला.


**18. डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३१ वी जंयत्ती :- दिनांक १४ एप्रिल २०२२ रोजी माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देणारे तसेच जगातील सर्वात मोठी**, **सक्षम राज्यघटना लिहिणारे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार**, **ज्ञानाचा अथांग सागर**, Symbol of Knowledge **भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने विनम्र अभिवादन करताना महाविद्यालयातील क्षण**.


**धारेश्वर शिक्षण संस्था संचलित**, **कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग द्वारे,व छत्रपती प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिंचोली लिं. तालुका कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने*** **आज दिनांक** 14 **एप्रिल** 2022 **रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची** 131 **वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विक्रमसिंह पवार सर होते. प्रमुख पाहुणे शाळेचे मुख्याध्यापक अस्मिता वाकेकर**, **योगेश काथार होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांनी केले. तर संचलन प्रवीण पाटील यांनी केले व आभार इतिहास विभाग प्रमुख डॉ.संजय वाकळे यांनी मानले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत**, **गीत गायन केले.यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते**.

**Yoga ऑनलाईन कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त योगासने करतांना परिवारासह महाविद्यालयातील कर्मचारी.**










महाविद्यालयाच्या परिसरात माझी वंसूधरा वृक्षारोपन कार्यक्रम आयोजन प्रसंगी रा.से.यो.चे स्वंयसेवक आणि महाविद्यालयातील उपस्थित स्टाफ











divyamarathi.com
29, Jul | Aurangabad Zila

अतुल, शीतल कासलीवाल परिवारातर्फे महाप्रसाद दिला,

मुळे, संचालक रणजित मुळे आदी सहकाऱ्यांनी सहकार्य केले.

# चिंचोली लिंबाजी येथील महाविद्यालयात वृक्षारोपण

प्रतिनिधी | चिंचोली लिंबाजी

धारेश्वर शिक्षण संस्था संचालित, कला व विज्ञान महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले.

प्रथम विद्यार्थ्यांनी गावातून वृक्षदिंडी काढून वृक्ष लावण्याच्या संदर्भात जनजागृती केली. प्राचार्य डॉ.विक्रमसिंग पवार, कार्यक्रम अधिकारी डॉ.गजानन चिट्टेवाड, प्रा.प्रतिभा आघाडे, डॉ.पुरुषोत्तम मनगटे, डॉ.उमाकांत गायकवाड, डॉ.अनिता खंडागळे, डॉ. योगेश भाले, डॉ.वंदना बनकर, प्रा. राजेश कांबळे, डॉ.यशवंत गाढे, डॉ.संजय मगर, डॉ.संजय वाकळे, प्रा. रामेश्वर राऊत व विद्यार्थी उपस्थित होते.

लोकशाहीर आण्णा भाऊ साठे जंयती व लोकमान्य ठिळक पुण्यतिथी निमित्त प्रतिमेचे पुजनकरतांना सर्व कर्मचारी.








आझादी का अमृत महोत्सव च्या निमीताने महाविद्यालयात स्वच्छता पंधरवाडा कार्यक्रम राबवतांना.

रा.से.या. च्या  स्वंयसेवकांना महाविद्यालयात बोलावले असता प्रवेशा वेळी स्वंयसेवकांचे थर्मामीटरने तापमान चेकअप करुन प्रवेश देतांना डॉ. गजानन चिट्टेवाड आदी.






स्वच्छते विषयी मार्गदर्शनकरतांना रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड.



प्रत्यक्ष स्वच्छता करतांना रा.से.यो. स्वंयसेवक व रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रतिभा आघार्डे आदी.



दिनांक २० ऑगस्ट २०२१ रोजी सदभावना दिनानिमीत्त राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेतांना रा.से.यो.स्वंयसेवक आणि महाविद्यालयातील स्टाफ.





**Covid-19 लसीकरणकॉम्प विषयी रा.से.यो स्वंयसेवक यांना मार्गदर्शन करतांना कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड**



महाविद्यालयात प्राथमिक आरोग्यकेंद्रचिंचोली व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कोव्हीड-१९ कॉम्प-१. आयोजीतकरण्यात आला या प्रसंगीलसीकरणासउपस्थित स्वंयसेवक आणि आरोग्यकर्मचारी.











शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करतांना डॉ. गजानन चिट्टेवाड या प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पावर डॉ. अनिता खंडागळे व प्रा. रामेश्वर राऊत.




राष्ट्रीय सेवा योजना दिना निमीत्त महावद्यिालयात विद्यार्थ्यांना कोरोना महामारीचे महत्व सांगून यामध्ये स्वयंसेवकांनी समाज जागरुती विषयी काय भूमिका द्यावी यांची माहिती देण्यात आली. आणि त्यांना मास्क, सानीटायझर वाटप करण्यात आले.



**रा.से.यो चा वर्धापन दिना निमित्ताने चिंचोली लिं येथील स्वंयसेवकांना कोरोना महामारीत आपली व परीवाराची सुरक्षा कशी द्यावी याविषयी माहिती सांगतांना महाविद्यालयातील रा.से.यो. समितीचेसदस्य डॉ. उमाकांत गायवाड.**



**महाविद्यालयात रा. से. यो. दिना निमीत्त स्वंयसेवकांना मास्क व सानीटायझर वाटप करतांना रा.से.यो. समीतीसदस्य.**



आझादी का अमृत महोत्सव निमीत्त महाविद्यालयात डॉ. ए.पी.जे अब्दूल कलाम यांच्या जंयती निमीत्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला या प्रंसगी ग्रंथ प्रदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.









आझादी का अमृत महोत्सव निमीत्त महाविद्यालयात करियर कट्टा या स्पर्धा परिक्षा विभागाचे अनावरण करण्यात आले.



**मिशन कवच कुंडल मोहिमे अंतर्गत महाविद्यालयात प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचोली व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कोव्हीड-१९ कॅम्प -२. राबविण्यात आला या प्रसंगी मोठयासंख्येने लसीकरण करण्यात आले.**












मिशन कवच कुंडल मोहिमे अंतर्गत महाविद्यालयात लसीकरण कॉम्प-२ उपस्थित स्वंयसेवक आणि कोरोना योधे व स्टाफ



मिशन कवच कुंडल मोहिमे अंतर्गत महाविद्यालयात लसीकरण कॅाम्प-२ उपस्थित स्वंयसेवक आणि कोरोना योधे व स्टाफ









आरोग्य कर्मचारी श्री काथार यांचे लसीकरण कॅाम्प-२ मध्ये स्वागत करतांना डॉ. पुरुषोत्तम मनगटे.







दिनांक ५ सप्टेबर २०२१ रोजी महाविद्यालयात रा.से.यो विभागाच्या वतीने शिक्षण दिन साजरा करण्यात आला.

**दिव्य मराठी विशेष** • धारेश्वर शिक्षण संस्थेत ऑनलाईन सभेला प्रतिसाद

# चिंचोलीत रासेयो दिन उत्साहात साजरा

**प्रतिनिधी** | चिंचोली लिंबाजी

येथील धारेश्वर शिक्षण संस्थेच्या कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

ऑनलाईन झालेल्या सभेत अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार होते. प्रमुख पाहुणे म्हणून उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर येथील प्रा. सविता दुधभाते होत्या. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सविता दुधभाते म्हणाल्या की 'महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण व्हावी, त्यांचा सर्वांगीण विकास घडून यावा, स्वालंबन, चारित्र्यवर्धन ही मूल्ये



मनात रुजावी. विद्यार्थी अधिक समाजाभिमुख व्हावा तसेच ज्या समाजात आपण राहतो काम करतो, त्या समाजाचं काहीतरी देणं लागतो या भावनेने आपल्या जवळपासच्या परिसरातील लोकांमध्ये मिसळून त्यांना समजावून घेऊन त्याच्यांसाठी रचनात्मक कार्य करण्याची प्रेरणा राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून मिळते. 'माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी' हे या योजनेचे बोधवाक्य आहे, ते आपणाला लोकशाही, सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देते, नि:स्वार्थ सेवेची गरज दाखवून देते. तसेच राष्ट्रीय सेवा योजना आपल्या देशाचा आर्थिक सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडते. शिवाय देशातील युवाशक्तीला नवचेतना देण्याचे कार्य व्यक्तिमत्त्व विकास, सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे कार्य, देशातील व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने ही योजना महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन प्रा. दुधभाते यांनी केले.

प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.गजानन चिट्टेवाड, सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा आघाडे यांनी केले. तसेच पाहुण्यांचा परिचय प्राध्यापक राजेश कांबळे यांनी करून दिला आणि कार्यक्रमाचे आभार डॉ.पुरुषोत्तम मनगटे यांनी मानले. डॉ. उमाकांत गायकवाड, डॉ. अनिता खंडागळे, डॉ. योगेश भाले, प्रा. सुनील काळे, डॉ. यशवंत गाडे, डॉ. संजय मगर डॉ. संजय वाकळे, प्रा.वंदना पाटील, डॉ. वंदना बनकर, आजिनाथ मनगटे, कैलास पदमे, शिवाजी हाडे, लक्ष्मण मोरे उपस्थित होते.



महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करतांना महाविद्यालयातील सर्व स्टाफ



संविधान दिना निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन रा.से.यो. विभागाअंतर्गत भारतीय संविधान आणि सद्यस्थितीया विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन करण्यात आले.




संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी करतांना प्राचार्य, रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी व स्टाफ



महापरिनिर्वान दिन प्रतिमा पुजन कार्यक्रम प्रसगी उपस्थीत स्टाफ





आजादी का अमृत महोत्सव निमीत्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाव्दारे आयोजीत ऑनलाईन सेमिनार.



Ad: Original story on Wattpad

लोकमत

# ‘विद्यार्थींनी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करावा’

चिंचोली लिंबाजी : कोरोनाच्या सावटामुळे सामाजिक, आर्थिक जीवन बदलून गेले आहे. रोजगाराच्या संधी कमी होताना दिसत आहेत. अशा स्थितीत ग्रामीण भागातील विद्यार्थी मागे न पडता त्यांनी आत्मविश्वासाने सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करावा, कोणत्याही परिस्थितीशी लढण्याची उमेद निर्माण करावी, प्रामाणिक प्रयत्नांची पराकाष्ठा निर्माण करावी, असे प्रतिपादन प्राचार्य संदीप पाटील यांनी केले. येथील धारेश्वर महाविद्यालयात आयोजित वेबिनारमध्ये ते बोलत होते.

या वेबिनारमध्ये डॉ. युवराज गहेराव यांनी ‘करिअर तयारी व मुलाखत तंत्र’ या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. विक्रमसिंग पवार व विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

वेबिनारचे सूत्रसंचालन डॉ. पुरुषोत्तम मनगटे यांनी केले. समारोप व आभार प्रा. वंदना पाटील, डॉ. वंदना बनकर केले. यशस्वितेसाठी प्रा. उमाकांत गायकवाड, प्रा. गजानन चिट्टेवाड, प्रा. योगेश भाले यांनी परिश्रम घेतले.

Hello Aurangabad Gramin
Page No. 5 Jul 04, 2021
Powered by: erelego.com

लोकमत Feedback

# चिंचोली लिंबाजीत कोरोना प्रतिबंधक लसीकरण

चिंचोली लिंबाजी, ता.३० (बातमीदार): चिंचोली लिंबाजी (ता.कन्नड) येथील धारेश्वर शिक्षण संस्थेच्या कला व विज्ञान महाविद्यालय व प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचोली लिंबाजी यांच्या संयुक्त विद्यमाने कोविड-१९ प्रतिबंधक लसीकरण शिबिर घेण्यात आले.

धारेश्वर संस्थेचे संस्थापक डॉ. टी.पी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर घेण्यात आले. या शिबिरामध्ये १८ वर्षे पूर्ण किंवा त्यावरील वयाच्या विद्यार्थ्यांनी स्वतःचे लसीकरण करून घेतले. आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य सहाय्यक पी. ओ. काथार, एस. आर. सुडके, एम. व्ही. पांढरे यांनी काम केले.

यशस्वितेसाठी प्रा.डॉ.पुरुषोत्तम मनगटे, प्रा.डॉ.गजानन चिट्टेवाड, डॉ. उमाकांत गायकवाड, प्रा. योगेश



चिंचोली लिंबाजी : येथील कला व विज्ञान महाविद्यालयात लस घेताना विद्यार्थी.

भाले, प्रा. अनिता खंडागळे, प्रा. राजेश कांबळे, डॉ. संजय मगर, प्रा. वंदना पाटील, प्रा. रामेश्वर राऊत, प्रा. प्रतिभा आघाडे, आजिनाथ मनगटे, अनिल जंजाळ, कैलास पदमे, लक्ष्मण मोरे, शिवाजी हाडे आदींनी परिश्रम घेतले.

३ जानेवारी २०२२ रोजी सावित्रीबाई फुले जंयत्ती निमीत्त बोलतांना प्रा. वंदना पाटील या प्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार.





सावित्रीबाई फुले जंयत्ती निमीत्त बोलतांना डॉ. यंशवत गाढे सर या प्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य, रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी व इतर



हिंदवी स्वराज्याचे प्रेरणास्थान राजमाता जिजाऊसाहेब आणि भारतातील अध्यात्मिक क्रांतीचे प्रणेते स्वामी विवेकानंद यांची जयंती धारेश्वर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली लिं. येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभागद्वारे दिनांक 12 जानेवारी 2022 रोजी साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विक्रमसिंह पवार सर होते तर या प्रसंगी राजमाता जिजाऊ यांच्या जीवन कार्यावर इतिहास विभाग प्रमुख डॉ.संजय वाकळे यांनी विचार मांडले तर जगाला अध्यात्म, तत्त्वज्ञान आणि वैराग्याची शिकवण देणारे युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्यावर लोकप्रशासन विभाग प्रमुख, डॉ.गजानन चिट्टेवाड यांनी विचार व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे संचालन डॉ. पुरुषोत्तम मनगटे यांनी केले तर आभार डॉ.वंदना बनकर यांनी मानले.




राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जंयत्ती साजरी करतांना व्यासपीठावर प्राचार्य, रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी व इतर




राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जंयत्ती बोलतांना रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड.



विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा करतांना रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रतिभा आघाडे, डॉ. संजय वाकळे








दिनांक २५ जानेवारी २०२२ रोजी राष्ट्रीय मतदार दिना निमित्त रा.से.यो. विभागाअंतर्गत ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन या प्रसंगीचे फोटो.









गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी करतांना प्राचार्य, डॉ. विक्रमसिंह पवार, प्रा. राजेश कांबळे रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ.गजानन चिट्टेवाड.










दिनांक १९ फेब्रूवारी २०२२ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जंयत्ती उत्साहात साजरी करतांनाचे काही क्षणचित्रे.





छत्रपती शिवाजी महाराज जंयत्ती निमीत्त बोलतांना प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार व्यासपीठावर रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड

छत्रपती शिवाजी महाराज जंयत्ती निमीत्त बोलतांना डॉ. पुरूषोत्तम मनगटे व्यासपीठावर प्राचार्य आणि मान्यवर आदी.





आजादी का अमृत महोत्सव निमीत्त दिनांक २३ फेब्रूवारी २०२२ रोजी मौजे भिलवाडी आणि कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या जयंती निमीताने आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन संयुक्त विद्यामाने करण्यात आले या प्रसंगीचे व्यासपीठावर डॉ. गणेश साबळे, डॉ पुरुषोत्तम मनगटे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड, प्रा. प्रतिभा आघार्डे, जि.प.प्रशालाचे मुख्याध्यापक शिवनाथ वाडेकर व ग्रामस्थ पदाधिकारी आणि विद्यार्थी आदी.





राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या जयंती निमीताने आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन या प्रसंगी बोलतांना कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड, डॉ. पुरुषोत्तम मनगटे डॉ. गणेश साबळे प्रा. प्रतिभा आघार्डे आदी.





आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन या प्रसंगी बोलतांना डॉ. पुरुषोत्तम मनगटे डॉ. गणेश साबळे आदी.

मौजे भिलवाडी जि. परिषद प्र. शाळा येथील आरोग्य तपासणी शिबीराचे समूह फोटो.




२३ फेब्रूवारी २०२२ रोजी मौजे भिलवाडी आरोग्य तपासणी शिबीरात विद्यार्थ्यांना फळ वाटप करतांना मान्यवार.










शिबीरात ग्रामस्थ व विद्यार्थ्यांची तापासणी करतांना डॉ. गणेश साबळे डॉ. योगेश नवले आदी.

दिनांक १४ एप्रिल २०२२ रोजी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.





डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकतांना प्राचार्य, डॉ. विक्रमसिंह पवार आणि रो.से.यो कार्यक्रमाधिकारी डॉ.गजानन चिट्टेवाड आदी.





कार्यक्रमाचे अभार व्यक्त करतांना डॉ. संजय वाकळे.





कार्यक्रमाचे संचालन करतांना श्री प्रविण पाटील आणि मंचावर उपस्थिती मान्यवर

**************The End NSS Regular Programme AY 2021-2022***********

धारेश्वर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित

# कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली (लि.)

ता. कन्नड जि. औरंगाबाद.

(नॅक मुल्यांकंन “ब” दर्जा प्राप्त)

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

# विशेष शिबीर अहवाल

## ग्राम विकासासाठी युवा

कार्यक्रमाधिकारी

डॉ. गजानन चिट्टेवाड प्रा.प्रतिभा आघार्डे

२०२१-२०२२

***प्रति,***
***मा.संचालक***
***राष्ट्रीय सेवा योजना विभाग,***
***डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद***

***विषय : राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबीराचा अहवाल स्विकारण्या बाबत.***

***संदर्भ : जा.क्र.*NSS/2021-22/05 Date 13/04/2022.**

***महोदय,***

*उपरोक्त संदर्भीय विषायास अनुसरुन सादर करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर मौजे गणेशपूर ता.कन्नड जि.औरंगाबाद येथे दिनांक **२४/०३/२०२२ ते ३०/०३/२०२२ या कालावधी दरम्यान घेण्यात आले आहे.** करीता सदर विशेष शिबीरातील कार्यकमाचा कृती अहवाल आपणास सादर करण्यात येत आहे.*

*तरी मे. साहेबांनी अहवाल स्विकारावा हि. नंम्र विनंती.*

***प्राचार्य***

***सोबत :***
***१) टंकलिखीत अहवाल.***
***२) रा.से.यो विशेष शिबीर कार्यक्रम पत्रिका.***
***३) ग्रामपंचायतीचे श्रमदान प्रमाणपत्र.***
***४) प्रत्यक्ष कार्य करतांनाचे कृतीयुक्त फोटो.***
***५) वृत्तपत्रातील बातम्या.***

## धारेश्वर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित;
## कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लि.) ता. कन्नड जि. औरंगाबाद
## राष्ट्रीय सेवा योजनेचा विशेष शिबीर अहवाल सन २०२१-२०२२.

महाविद्यालय ते मौजे गणेशपूर हे ग्राम ०४ कि.मी. अंतरावर आहे. सदर रा.से.यो. चे विशेष शिबीर हे दिनांक २४ मार्च २०२२ ते ३० मार्च २०२२ या कालावधीत घेण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व धारेश्वर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित ; कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली लिंबाजी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष सात दिवशीय शिबीर `ग्राम विकासासाठी युवा` ही थिम व विचार घेवून आम्ही दिनांक २४ मार्च २०२२ ते ३० मार्च २०२२ पर्यंत्न मौजे गणेशपूर येथील ग्रामस्थाच्या ग्रामपंचायतीलच्या सहमतीने चर्चा करुन कार्य करण्याचे ठरवण्यात आले. आमच्या महाविद्यालयातील रा.से.यो. शिबीराचे हे १३ वे वर्षे असून मौजे गणेशपूर येथील हे पहिले वर्षे आहे. या सर्व सुधारणेत गावक-यांना सरपंचाना, जि.प.येथील शिक्षक व महाविद्यालयातील स्टाफ आणि आमच्या स्वयसंवकांना सामावून घेवून स्वच्छता, कुंटूंबाचा सर्वे, करुन गावातील समस्या जाणून घेणे तसेच काळाची गरज ओळखून लसीकरण मोहीमेतील सहभाग, आधार कार्ड बॅक ऑकाऊटला जोडणी व कुपोषीत बालके त्यांचा आहार त्याच बरोबर गावात राबवल्या जाणा-या योजना व त्यांची माहिती करुन घेण्यासाठी व उपरोक्त समस्याची सोडवणूक करण्यासाठी कार्याची सुरवात दिनांक २४/०३/२०२०२२ पासून केली आहे. युवक-युवतींच्या सृजनशिलतेला चालना देऊन त्यांच्या विधायक कार्यातून समाज परिर्वनाकरीता कार्यान्वित करण्याच्या उद्देशाने दर तीन वर्षांला वेगवेगळया गावामध्ये जाऊन जल संवर्धन, स्वच्छता, पर्यावरण विकास, जल व्यवस्थापन व जल संवर्धन यासारख्या थिम घेऊन आम्ही कार्य करतो आहोत.

मौजे गणेशपूर या गावामध्ये आमचे हे पहिले वर्ष आहे. मागील वर्षीसुध्दा अतिशय उल्लेखनीय कार्य आमच्या विद्यार्थ्यांनी केले होते. त्याच प्रमाणे या वर्षीसुध्दा आम्ही गावातील स्वचछता, सदर गावात प्रंचड कचरा अस्ताव्यस्त होता तो एकत्र करुन त्यांची विल्हेवाट लावली तसेच नदीची साफसफाई करुन लोक जागृतीचे कार्य केले. सामाजिक, आरोग्य विषयक सर्वे मौजे गणेशपूर येथील कुटूंबाना भेटी देवून केला आहे. त्याशिवाय वाढते नागरीकरण, प्रदूषण, वृक्षतोड, आटते जलस्त्रोत, हवामान बदल यामूळे पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस तापू लागले आहे. या सगळया मानवनिमित समस्या असल्याने यातून मार्ग काढण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण हा महत्वाचा संदेश आमच्या स्वंयसेवका मार्फत माझी वंसूधरा अभियाना अंतर्गत देण्यात आला. आणि प्रत्येकाने एक तरी झाड लावायचा संकल्प या निमिताने करण्यात आला. त्याच बरोबर हया संदेशाची अंमलबजावणी करण्याच्या हेतून आम्ही अतिशय मेहनतीने, उणाची पर्वा न करता खड्डे करुन ग्राम परिसरात व मंदिर परिसरात वृक्षारोपन पूर्ण केले.

दिनांक २४/०३/२०२२ रोजी धारेश्वर शिक्षण संस्था कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली लिंबाजी येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत घेण्यात येणारे सात दिवसीय विशेष शिबिराचे उद्घाटन माननीय डॉ. टी.पी.पाटील साहेब आणि प्रमुख पाहुणे डॉ. चंद्रशेखर देवकते सर रा.से.यो. गट समन्वयक आणि मोजे गणेशपुर येथील प्रथम नागरिक व पदाधिकारी, ग्रामस्थ आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांच्या साक्षीने थाटात करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील ग्रामस्थ, पदाधिकारी, स्वयंसेवक आणि महाविद्यालयातील स्टाफ उपस्थित होता.

*दिनांक* 25/03/2022 *रोजी* दुसऱ्या दिवशी सकाळी श्रमसंस्कार शिबिरात गावामध्ये रॅली काढून स्वच्छतेचा, जलसंवर्धनाचा, माझी वसुंधरा अभियानाचा, कवच कुंडल मोहिमेचा आणि कोरोना महामारी तील सुरक्षिततेचा संदेश राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक का तर्फे मोजे गणेशपूर येथील ग्रामस्थांना देण्यात आला आणि आणि ग्राम स्वच्छता करण्यात आली व दुपारच्या बौद्धिक सत्रामध्ये प्रा. सिताराम मोगल, शिवाजी महाविद्यालय, कन्नड यांचे समाज- समाज माध्यमे आणि विद्यार्थी यावर व्याख्यान ठेवण्यात आले.

*दिनांक* 26/03/2022 *रोजी* राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय विशेष शिबिराच्या तिसऱ्या दिवशी सकाळी श्रमसंस्कार शिबिरात मोजे गणेशपुर येथे कुटुंब भेटी घेऊन त्यांना मिळणाऱ्या योजना, मतदान कार्ड, मतदार नोंदणी, लसीकरणाचे प्रमाण किती झाले आहे आणि शिल्लक किती आहे व बँक अकाउंट ला आधार कार्ड जोडणी इत्यादीचा सर्वे राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक करण्यात आला. आणि दुपारच्या बौद्धिक सत्रामध्ये, पिशोर पोलिस स्टेशन ता.कन्नड येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) सौ.कोमल शिंदे मॅडम यांचे मुलींचे स्व-स्वंरक्षण काळाची गरज यावर व्याख्यान ठेवण्यात आले. याप्रसंगी मॅडम म्हणाल्या मुलींनी आत्मनिर्भर होणे अत्यंत गरजेचे आहे आणि ही आत्मनिर्भरता शिक्षणातून मिळते. सावित्रीबाई फुलेंनी महिलांना नोकरी लागावी यासाठी शाळा काढल्या नाहीत तर महिला या सक्षम हव्या आत्मनिर्भर व्हाव्या त्यांना बरं वाईट जगातलं ज्ञान कळावं यासाठी प्रामुख्याने महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शाळा सुरू केल्या आहेत.

शिक्षणाने जगाचे ज्ञान येथे आपण कुठे आहोत आणि जग कुठे जात आहे. याची जाणीव होते परंतु ही जाणीव करून घेत असताना सोशल मीडियापासून दूर राहून, आपल्या आईवडिलांची जाणीव ठेवून अभ्यास करावा जिद्द,चिकाटी आणि

**नियोजनाने कोणत्याही क्षेत्रात यश मिळवता येते. विद्यार्थ्यांनी अभ्यासाच्या दिवसाचे नियोजन करावे त्या दिवसांमध्ये तेवढे काम झालेच पाहिजे तेवढा अभ्यास झालाच पाहिजे अशी जिद्द ठेवा असा सल्ला राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक यांना दिला त्याचबरोबर जगात अनेक फसवेगिरी च्या युक्ती लोक शोधताहेत अशा फसव्या लोकांच्या आमिषाला बळी न पडता आपण जागरूक राहून आपले आपण संरक्षण केले पाहिजे कारण जगात फुकट काहीच भेटत नाही लक, नशीब वगैरे काहीच नसते म्हणून मेहनत करा आणि आयुष्यात यशस्वी व्हा असे मोलाचे मार्गदर्शन शिंदे मॅडम यांनी केले.**

*दिनांक* 27/03/2022 *रोजी* **विशेष शिबिराच्या चौथ्या दिवशी सकाळी श्रमसंस्कार शिबिरात मोजे गणेशपुर येथील गणपती संस्थान च्या बाजूचे नदीपात्र पूर्णता स्वच्छ करण्यात आले. आणि दुपारच्या बौद्धिक सत्रामध्ये, मोरेश्वर महाविद्यालय भोकरदन येथील लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. संजय बीरंगणे यांचे आयुष्यातील ध्येय आणि मी...यावर व्याख्यान ठेवण्यात आले... याप्रसंगी डॉ. संजय बीरंगणे म्हणाले विद्यार्थ्यांनी जीवनात सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपली ध्येय साध्य करण्यासाठी झोपेत स्वप्न न बघता दिवसा जागे राहून स्वप्न बघा आणि ते स्वप्न साकार करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांचे शोर्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मेहनत, महात्मा गांधी ची जिद्द, डोळ्यासमोर ठेवून ध्येयाकडे वाटचाल करा. समाज तुम्हाला पुढे जाऊ देणार नाही आणि मागे ही राहू देणार नाही त्यामुळे तुम्ही समाजाकडे, मित्राकडे डोळेझाक करून निश्चित केलेल्या ध्येयाकडे वाटचाल करा**

**मग जो समाज तुम्हाला हे करू नका ते करू नका असं म्हणतो तोच समाज, तेच मित्र तुमच्या स्वागताला समोर येतील. म्हणून अभ्यासात सातत्य ठेवून वाचन जास्त करा. आपल्याला प्रेरणा देतील अशा व्यक्तीचे पुस्तके वाचा व्हिडीओ बघा आणि आयुष्याला पर्याय, संधी निर्माण करा तेव्हाच तुम्ही उज्ज्वल भारताचे भावी आणि सक्षम नागरिक होऊन देशाच्या विकासाबरोबरच आपला आणि समाजाचा विकास करण्यात योगदान द्याल. जिद्द, चिकाटी आणि अभ्यासात सातत्य ठेवल्यास जगातील कोणत्याही क्षेत्रात यश मिळवता येते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सोशल मीडियापासून दूर राहून चांगली चांगली पुस्तके वाचा पुस्तकातून मिळणार हे ज्ञान तुम्हाला आयुष्यभर काम देते. जगातील सर्वात मौल्यवान रत्न म्हणजे मेहनत आणि**

**आयुष्यातील सर्वोत्तम साथीदार म्हणजे आपला आत्मविश्वास आहे* असे त्यांनी म्हटले आहे.**

